
Tel. 55627

PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार २० मार्च, १९६८ | अंक ६






STUSA B/66

नांगर, पंपिंग सेट, पेरणी यंत्रें, कल्टिवेटर, ऊसांचे चरक, स्लूस व्हाल्व, शेगायंत्रें यांसारख्या किर्लोस्कर यंत्रांवर महत्त्वाकांक्षी शेतकरी व बागाईतदार आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं भरंवसा ठेवतात. शेती व बागाईत यांचें उत्पादन वाढविण्यांत हीं यंत्रें महत्त्वाची कामगिरी बजावींत आहेत.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**
किर्लोस्करवाडी, जिल्हा-सांगली

### एंजिनिअरांना कामधंदा पुरविण्याचे प्रयत्न

तांत्रिक शिक्षण पूर्ण केलेल्या एंजिनिअरांसारख्या कसबी लोकांवर बेकारी कोसळल्यामुळे शिक्षणक्षेत्रात मोठी खळबळ माजली; आणि त्यांना कामधंदा पुरविण्याचे प्रयत्न सुरू झाले. मध्यवर्ती सरकाराचे शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुण सेन ह्या विषया-संबंधी बोलताना म्हणाले की सध्या बेकार असलेल्या एंजिनिअरांची संख्या सुमारे १२ हजार आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांच्या अवधीत त्यांना योग्य प्रकारच्या नोकऱ्या देता येणे शक्य आहे. देशातील बेकार एंजिनिअरांची एकूण संख्या ४० हजारांच्या जवळपास असावी. त्यांच्यापैकी २५ टक्के एंजिनिअरांना तावडतोब नोकऱ्या देता येतील. भारताच्या संरक्षण खात्यात एंजिनिअरांच्या हजारो जागा रिकाम्या आहेत. इतर खात्यांतूनही त्यांना सामावण्यासाठी काय करता येईल, ह्यासंबंधी विचारणा करण्यात येत आहे. त्यांना कामावर घेण्यात नियमांचा अडथळा येत असेल तर तो दूर करून विलंब टाळण्यात येईल. तथापि ज्या एंजिनिअरांना छोट्या स्वरूपाचे स्वतंत्र धंदे करण्याची इच्छा असेल त्यांना मोकळ्या हाताने आर्थिक साह्य देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भारताच्या शेजारी देशांत अनेक देश विकसनशील अवस्थेत आहेत. त्यांना कुशल तंत्रज्ञांची फार आवश्यकता आहे. आशिया व आफ्रिका खंडांतील अशा देशांत हिंदी एंजिनिअरांना नोकऱ्या मिळण्याची कितपत शक्यता आहे ते अजमावून पाहण्यात येत आहे. एंजिनिअरिंगचे शिक्षण देणाऱ्या संस्थांतून प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत जी ३० टक्के कपात करण्यात येत आहे तिचा निवडीच्या दृष्टीने फायदा होईल. कारण प्रवेश देताना आता गुणवत्तेकडे अधिक लक्ष देता येईल.

---

### आस्वान धरण पुढील वर्षी पूर्ण होणार

इजिप्तमध्ये नाईल नदीवर आस्वान येथे बांधण्यात येत असलेले धरण १९६९ च्या अखेरीस पूर्ण होणार आहे. ह्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या जलविद्युत्केंद्रात १,००० कोटी किलोवॅट विजेची निर्मिती करता येईल. ही निर्मिती इजिप्तमधील सध्याच्या वीजनिर्मितीपेक्षा ५ पटीने अधिक होईल. धरणाच्या कामावर २४,००० इजिप्शिअन कामगार आणि १ हजार रशियन तज्ज्ञ अहोरात्र खपत आहेत. मुळात हे धरण १९७० अखेर पुरे होईल असा अंदाज होता. धरणामुळे उत्पन्न झालेल्या मानवनिर्मित सरोवराला नासर ह्यांचे नाव देण्यात आले आहे. त्याचा विस्तार ३१५ चौरस मैलांवर पसरेल. इजिप्त व रशिया ह्यांच्यातील सहकार्याचे स्मारक म्हणून २५२ फूट उंचीचा एक मनोरा धरणावर बांधण्यात येणार आहे. मनोऱ्यासाठी १० लाख डॉलर्स खर्च येणार आहे.

---


## WE SERVE THE NATION

**IT WAS A FACT**

DISCOVERY of Penicillin was due to a stroke of luck.

**BUT**

Most modern drugs are fruits of intense research.
A result of a planned, dedicated and devoted desire to find out something new.
A fulfilment of a pledge to serve the suffering humanity.

**WE BOAST**

Compared to Hindustan Antibiotics a bee-hive is not the Busiest Centre.

**WE SERVE THE NATION**

With Penicillin, Streptomycin and our new find Hamycin.

**REMEMBER**

Hindustan Antibiotics Ltd. is a peoples project dedicated to raise the economic and health standards of the common man.

## *Hindustan Antibiotics Ltd.*

( A Government of India Undertaking )

PIMPRI ( POONA-18 )

☆ अर्थ ☆

बुधवार, २० मार्च, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## आमचा मानसिक दृष्टिकोणच उत्कर्षाला प्रतिकूल

### सामाजिक परिवर्तन व सामाजिक शिस्त आवश्यक

दक्षिण आशियातील पाकिस्तानापासून इंडोनेशिया पर्यंतच्या देशांत जगातील एक तृतीयांश लोक राहतात. निर्दय दारिद्र्य, भयानक लोकसंख्यावाढ, कमजोर अर्थव्यवस्था आणि कम्युनिस्टांचे आक्रमण, हे त्या लोकांपुढील अवघड प्रश्न आहेत. ट्वेंटिएथ सेंचरी फंडाने स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ गनर मर्डल ह्यांची दक्षिण आशियातील प्रश्नांचा आणि त्याच्या भवितव्याचा अभ्यास करण्यासाठी योजना केली. त्यांनी दहा वर्षे त्यासाठी वेचली, (त्यापैकी तीन वर्षे ह्या देशांतून प्रवास केला) आणि आपले निष्कर्ष २,५०० पृष्ठांच्या तीन खंडांत प्रसिद्ध केले आहेत.

भांडवलाचा, साधनसंपत्तीचा आणि शिक्षणाचा अभाव, ह्यांमुळे ते देश मागासलेले आहेत, असे म्हटले जाते. गनर मर्डल ह्यांच्या मते, मागासलेपणाची खरी कारणे अशी आहेत :— “कामात शिस्तीचा, वक्तशीरपणाचा आणि पद्धतशीरपणाचा अभाव, लोकभ्रम आणि खुळचट कल्पना, बदल आणि प्रयोग करण्याबद्दल अनुत्सुकता, कर्तृत्वहीनता, अंगमेहनतीच्या कामाबद्दल तुच्छता, अन्याय सहन करण्याची सवय, सहकार्याबाबत अनास्था.”

ह्या प्रवृत्तीत बदल घडवून आणणे लोकशाही पुढाऱ्यांना, त्याचप्रमाणे हुकूमशहांनाहि साधलेले नाही. त्यामुळे, उत्कृष्ट आखलेल्या, पाश्चात्त्यांनी देखरेख केलेल्या आर्थिक योजनाही फलद्रूप होत नाहीत. मूलग्राही सुधारणा घडवून आणण्यात आणि सामाजिक शिस्त निर्माण करण्यात सर्वच राजकीय पक्ष असमर्थ ठरले आहेत.

दक्षिण आशियातील लोकसंख्या मर्यादेत ठेवता येईल, असे मर्डल ह्यांना वाटत नाही. कुटुंबनियोजन देशव्यापी झाले असे गृहीत धरले तरी बेकारीची वाढ थांबायला आणखी एक पिढी जावी लागेल. उद्योगीकरणाचा उपायहि फसेल; कारण पाश्चात्त्य देशांच्या औद्योगिक प्रगतीची गती झपाट्याने वाढत आहे.

आशियातील देशांमधील लोकांनीच सामाजिक परिवर्तन घडवून आणले पाहिजे आणि सामाजिक शिस्त लावली पाहिजे; शिक्षण म्हणजे कष्टातून सुटण्याचा पासपोर्ट, ही आजची परिस्थिती पार बदलली पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्याला समान आकाराची शेते देणारी जमीन कायद्याची सुधारणा उपयोगी पडणार नाही; शेतकरी अधिक कार्यक्षम व्हायला हवेत.

थोडक्यात म्हणजे, ह्या तज्ज्ञाच्या मते, दक्षिण आशियाच्या दुरवस्थेस स्वतः आशिआई लोक, आणि त्यांचा जीवनविषयक व कष्टविषयक अयोग्य दृष्टिकोण, हीच कारणीभूत आहेत.

---

### अंदाजपत्रक बचतीला उपकारक नाही

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री बी. आर. शेणॉय ह्यांनी भारत सरकारच्या ताज्या अंदाजपत्रकासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. अहमदाबाद येथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की अंदाजपत्रकामुळे अर्थव्यवस्थेला वेग येईल अशी आशा करण्यास फारशी जागा नाही. बचत करण्यास उपकारक होईल अशी व्यवस्था त्यात दिसत नाही. चालू घडीच्या उपभोगाला मर्यादा घालण्यात आल्या तरच बचत करण्यास चालना देता येईल. अर्थव्यवस्थेला झालेल्या दुखण्याचे अंदाजपत्रकात केलेले वर्णन ठीक आहे. परंतु, दुखण्याची कारणमीमांसा मात्र सुस्पष्ट रीतीने करण्यात आलेली नाही. अर्थव्यवस्था निरोगी होण्यासाठी बचत वाढविण्यात आली पाहिजे. तुटीच्या अर्थसंकल्पाला रजा देण्यात आली पाहिजे; सर्व प्रकारची नियंत्रणे रद्द करण्यात आली पाहिजेत; आयातीवरील बंधने काढून टाकण्यात आली पाहिजेत आणि अन्नधान्य व गरजेच्या इतर वस्तू ह्यांचा व्यापार मुक्त करण्यात आला पाहिजे. अंदाजपत्रकांत नफ्यावरील कर, कंपन्यांच्या नफ्यावरील जादा आकार आणि वार्षिक ठेवी ह्यांच्या संबंधी काही सवलती देण्यात आल्या आहेत. परंतु ह्या सवलती म्हणजे हत्तीला खोबऱ्याचा एखादा तुकडा टाकण्याइतक्या अल्प आहेत. भांडवलाच्या बाजाराला उत्तेजन देणे असेल तर राष्ट्रीय बचतीत वाढ होण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्यासाठी उपभोग्य खर्चावर नियंत्रण घालण्यात आले पाहिजे आणि ह्या कामी मध्यवर्ती व राज्य सरकारांनी स्वतःच्या आचरणाने धडा घालून दिला पाहिजे; तरच अर्थव्यवस्था योग्य मार्गावर येण्याची आशा आहे.

---

### सहानुभूती सवलतीच्या दराने व्यक्त करा

शुभेच्छा व्यक्त करणाऱ्या सवलतीच्या दराच्या तारांप्रमाणे सहानुभूती व्यक्त करणाऱ्या सवलतीच्या दराच्या तारांची योजना सरकार आखीत आहे.


## मद्रास येथे भरलेले औद्योगिक प्रदर्शन

मद्रास येथे भरविण्यात आलेले आंतरराष्ट्रीय व्यापार आणि औद्योगिक प्रदर्शन ७ आठवड्यांनंतर समाप्त करण्यात आले आहे. आधुनिक कालात भारतात झालेल्या औद्योगिक प्रगतीचे दर्शन ह्या प्रदर्शनात चांगल्या रीतीने पाहावयास मिळाले. प्रदर्शनात १८८ दालने उभारण्यात आली होती. त्यात १७ दालने परदेशांची होती. भारतात ह्यापूर्वी भरविण्यात आलेल्या अशा प्रदर्शनापेक्षा मद्रासमधील प्रदर्शनाची सजावट पुष्कळच चांगली होती. तरीसुद्धा लिपझिग येथील अगर इतर परदेशांतील प्रदर्शनांच्या मानाने ती कमी प्रतीची होती. प्रदर्शनाचा विस्तार २२५ एकरांवर पसरलेला होता आणि ते पाहण्यासाठी ३० लाख प्रेक्षक येऊन गेले. आशिआ आणि आफ्रिकेमधील विकसनशील देशांना भारताची प्रगती कोठवर झाली आहे ते समजण्यास प्रदर्शनाने चांगली मदत झाली. ह्या दोन्ही खंडांतील काही देशांच्या प्रतिनिधींना प्रदर्शन पहाण्यासाठी मुद्दाम बोलावण्यात आले होते. शिवाय दिल्ली येथील व्यापार व विकास परिषदेला आलेल्या परदेशी प्रतिनिधींनीही प्रदर्शनाला भेट दिली. प्रदर्शनात अनेक प्रकारची औद्योगिक यंत्रसामग्री व साधने मांडून ठेवण्यात आली होती. ती पाहून अनेक परदेशांकडून विचारणा करण्यात आली. परदेशीय दालनात मांडण्यात आलेली बहुतेक यंत्रसामग्री विकून टाकण्यात आली आहे. रशिआने खाजगी उद्योगपती आणि सरकारी संस्था ह्यांच्याशी ४३ व्यापारी करार करण्यात यश मिळविले आहे. करारातील व्यापारी देवघेव ३·४ कोटी रुपये किमतीची आहे. प्रदर्शनासाठी बांधण्यात आलेली दालने तशीच ठेवण्यासाठी मद्रास सरकार प्रयत्न करीत आहे.

---

## सिंधू नदीवर मातीचे प्रचंड धरण

पश्चिम पाकिस्तानात सिंधू नदीवर जगातील सर्वात मोठे मातीचे धरण बांधण्यात येणार आहे. ते बांधण्याचे काम इटालिअन व फ्रेंच कंपन्यांच्या एका गटाला मिळाले आहे. हे धरण इजिप्तमधील आस्वानच्या धरणाच्या तिप्पट मोठे होईल आणि त्यावर सुमारे २०० कोटी किलोवॅट इतकी वीज उत्पन्न करण्यात येईल. त्याशिवाय सिंधमधील रेताड विभागातील खूप मोठ्या जमिनीला पाणीपुरवठा करता येईल. प्रादेशिक विभागांचा विकास करण्याच्या कार्यक्रमातील प्रचंड काम म्हणूनच त्याचा उल्लेख करावा लागेल. धरणासाठी ६२·३ कोटी डॉलर्स खर्च येईल. हे काम मिळविण्यासाठी अमेरिकन, ब्रिटिश, जर्मन आणि स्विस कंपन्यांच्या गटांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती.

# दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लिमिटेड

(हेड ऑफिस : महात्मा गांधी रोड, मुंबई)

"सेंट्रल" ला

तुमचे बचत केंद्र करा.

**पुण्यांतील कचेऱ्या**

महात्मा गांधी रोड–पुणे शहर

*मुख्य कचेरी*

लक्ष्मी रोड, पुणे शहर — डेक्कन जिमखाना, पुणे–४

टिळक रोड, पुणे–९. — भवानी पेठ, पुणे–९

स्वार गेट, पुणे–९.

आमची पुणे कँप मुख्य कचेरी एअर कंडिशण्ड असून सेफ डिपॉझिट व्हॉल्टने सुसज्ज आहे.

टिळक रोड, डेक्कन जिमखाना आणि स्वारगेट कचेऱ्यांतहि लॉकर्स उपलब्ध आहेत.

*एस. आर. टिपणीस* — चीफ एजंट (पुणे विभाग)

*व्ही. सी. पटेल* — जनरल मॅनेजर

### नलिका विहिरींमुळे उत्पन्न झालेला नवा प्रश्न

उत्तर प्रदेशात ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे तेथे नलिका विहिरी खोदण्यात आल्या आहेत अगर येत आहेत. अशा विहिरी खोदण्याच्या कामात फरुकाबाद जिल्ह्याने आघाडी मारली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ह्या जिल्ह्यांत ९४० विहिरी खोदण्याचे ठरविण्यात आले होते. परंतु तीन वर्षाच्या अवधीत २,३२१ विहिरी खोदून पुऱ्या करण्यांत आल्या आहेत. पाण्याचा पुरवठा निश्चित होऊ लागल्यामुळे शेतकऱ्यांत जमीन कसण्याचा उत्साहही वाढीस लागला असून त्याचा फायदाही त्यांना मिळत आहे. काही शेतकरी नुसत्या भाजीपाल्यावर रोज १०० रुपये मिळवीत आहेत. काही शेतकऱ्यांनी नलिका विहिरी खोदण्याचा खर्च बटाट्याच्या एका पिकातच मिळविला आहे. तथापि, ह्या समृद्धतेतूनच एक नवा सामाजिक प्रश्न उत्पन्न होऊ पहात आहे. नलिका विहिरी खोदून काढणारे बहुतेक शेतकरी संपन्न असून वरिष्ठ वर्गाचे आहेत. अर्थात त्यांना आपल्या शेतावर राबण्याची सवय नव्हती आणि गरजही नव्हती. त्यामुळे ते शेतावर स्वतः फारसे खपत नसत. मजुरीने माणसे लावून शेती कसण्याची त्यांची पद्धत होती. पण आता चित्र पालटत चालले आहे. पाण्याचा पुरवठा नलिका विहिरींमुळे मुबलक होऊ लागला; त्याचबरोबर शेतीवरील कष्टाची कामे यंत्राच्या साह्याने करण्याची प्रवृत्ती वाढली. त्यामुळे सधन शेतकरी स्वतःच जमिनीवर काम करू लागला आहे. त्याचा परिणाम म्हणून शेतमजुरांना मागणी कमी झाली आहे. शेतमजूर बहुधा हरिजन असतात आणि त्यांना स्वतःची जमीन नसते. रोजगारावर परिणाम झाल्यामुळे ते अस्वस्थ झाले आहेत.

---

### अन्नधान्य विभागांमुळे टंचाई अधिकच वाढली.

हिंदमधील अन्नधान्याची टंचाई मुळात अपुऱ्या उत्पादनामुळे उद्भवलेली आहे. परंतु उत्पादन होत असलेल्या अन्नधान्याचे नीट वितरण होत नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट झालेली आहे असे मत व्यक्त करण्यात येते. भारताच्या अन्न महामंडळाचे माजी अध्यक्ष श्री. पै ह्यांनी ह्या मताला पाठिंबा दिला आहे. मद्रास येथे अन्न प्रश्नावर बोलताना ते म्हणाले की एका राज्याचा एक धान्य विभाग, जिल्ह्या-जिल्ह्यांत माल नेण्या-आणण्यावर असलेली बंधने, वाहतुकीवरील निर्बंध, ह्या कारणांमुळे टंचाईने अधिकच उग्र स्वरूप धारण केलेले आहे. त्याच बरोबर अन्नावर संस्करण करण्याच्या व साठविण्याच्या अपुऱ्या सोई ह्यांनीही टंचाईला हातभार लावला आहे. अन्नविभागामुळे फक्त चोरटा व्यापार करणाऱ्यांचा आणि समाजद्रोही लोकांचाच काय तो फायदा झाला आहे आणि शेतकऱ्याला मात्र हानी सोसावी लागत आहे. टंचाई कमी करण्यासाठी धान्याची आयात करण्यात येते. पण अनुभव असा आहे की आयात बंद झाल्याशिवाय देशात अधिक धान्याची पैदास होणारच नाही. अन्नाच्या पुरवठ्याबद्दल कोणतेही धोरण स्वीकारण्यात आले तरी सरकारने स्वतःजवळ धान्याचा शिलकी साठा करून ठेवल्याशिवाय ते यशस्वी होणार नाही. हे धोरण आखताना देशातील व्यापाऱ्यांचे सहकार्य मिळविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात आला पाहिजे. कारण, देशांतील सर्वांत अधिक बुद्धिवान असा हा वर्ग आहे. अन्नधान्याच्या सक्तीच्या वसुलीच्या योजनेने ग्राहकांचा नेहमीच तोटा होतो. कारण, ह्या योजनेमुळे ग्राहकांना कमी प्रतीचा माल मिळतो आणि चांगला माल काळ्या बाजारात जातो.

---

### अन्न महामंडळाचा पगारावरील खर्च

अन्नधान्याच्या भावातील प्रमाणाबाहेर होणारे चढउतार कमी करण्यासाठी आणि देशांत अन्नधान्याचा किमान साठा करण्यासाठी अन्नमहामंडळाची स्थापना करण्यात आली. महामंडळाचे हेतू साध्य होण्यास अजून बराच अवधी लागेल असे दिसते. दरम्यान मंडळाच्या कारभाराविषयी पुढील माहिती प्रसिद्ध झाली आहे. अन्न महामंडळातील नौकरांची संख्या १४,५०० आहे. त्यांच्या पगारासाठी मंडळाने गेल्या वर्षी २.२५ कोटी रुपये खर्च केले. नौकरवर्गात २० वरिष्ठ दर्जाचे अधिकारी आहेत. त्यांना दरमहा २,००० रुपयांपेक्षा अधिक पगार मिळतो. महामंडळाच्या अध्यक्षांचा पगार दरमहा ४ हजार रुपयांपेक्षा अधिक आहे. सर्व देशभर मिळून मंडळाच्या ठिकठिकाणी १०२ शाखा आहेत. त्या चालविण्यासाठी मंडळाला दरसाल सरासरी ६ लाख रुपये खर्च येतो. कॉर्पोरेशनच्या वाहतुकीच्या गाड्यांची किंमत ५० लाख रुपये आहे. भाड्याने घेतलेल्या गुदामांसाठी ४० लाख रुपये द्यावे लागतात.

---

### अखिल भारतीय आकाशवाणीचे श्रोते

अखिल भारतीय आकाशवाणीवरून प्रक्षेपित करण्यात येणारी वार्तापत्रे ऐकणारांची संख्या ५ कोटींच्या घरात आहे. ह्याचा अर्थ असा की प्रत्येक १० माणसांत एक माणूस वार्तापत्राचा श्रोता असतो. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरून रोज १०० वार्तापत्रे प्रक्षेपित करण्यात येतात. एकूण वार्तापत्रांची रोजची संख्या १७७ आहे. वार्तापत्रात १९ भारतीय भाषांतील आणि १७ परदेशीय भाषांतील असतात. भारत स्वतंत्र झाला त्या वेळी म्हणजे ऑगस्ट १९४७ मध्ये देशातील रेडिओ रिसीव्हर्सची संख्या १० लाख होती. आता ती ८० लाखांवर गेली आहे. विविध भारतीवरून प्रक्षेपित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमापेक्षा सीलोन रेडिओवरील कार्यक्रम ऐकणारांची संख्या एक तृतीयांशाने कमी आहे. मुंबईमध्ये सांपत्तिकदृष्ट्या वरच्या थरात मात्र सीलोन रेडिओ अधिक प्रमाणात ऐकला जातो.

## वन्य पशूंसाठी राखण्यात आलेले अभयस्थळ

आसाम राज्यात गोहाटीपासून सुमारे १५० मैलांवर 'काझीरंगा'चे राखीव जंगल मुद्दाम संरक्षित करण्यात आले आहे. भारताच्या वन्य पशुसृष्टीत वैशिष्ट्याचे स्थान असलेला एकशिंगी गेंडा ह्याच राखीव जंगलाच्या आश्रयाने अजून टिकून राहिला आहे. एरव्ही तो केव्हांच नामशेष झाला असता. ६० वर्षांपूर्वी हा प्राणी दुर्मिळ होत चालला होता. परंतु आता त्यांची संख्या ८०० झाली असून त्यांतील निम्मे गेंडे 'काझीरंगा' जंगलांतच सापडतात. उत्तर भारतात ह्या प्राण्यांचे वास्तव्य प्राचीन काळापासून असल्याचे पुरावे सांपडतात. मोहेंजोदारो संस्कृतीच्या अवशेषांत गेंड्याचे ठसे असलेल्या मुद्रा सापडलेल्या आहेत. १९ व्या शतकाच्या प्रारंभी मात्र त्यांची संख्या बरीच घटली. तथापि तैमूरलंग व बाबर ह्यांच्या चरित्रांत गेंड्यांच्या शिकारीची वर्णने आहेत. अलीकडील काळात हा प्राणी आसाम, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये तुरळकपणे आढळून येत असे. पण जंगल तुटल्यामुळे आणि गेंड्यांची अनिर्बंध हत्या झाल्यामुळे त्यांची संख्या घटली. म्हणून १९०८ साली 'काझीरंगा'चे जंगल वन्यपशूंचे अभयस्थान म्हणून जाहीर करण्यात आले. ह्या जंगलाचा विस्तार सुमारे १६० चौरस मैल आहे. त्यांत गवती कुरणे, दलदलीचा प्रदेश आणि घनदाट अरण्य ह्यांचा समावेश आहे. जंगलांत गेंड्याशिवाय इतरही अनेक प्रकारचे दुर्मिळ वन्य पशू वास करतात. गेंड्याच्या नाकावरील शिंगाचा औषधी उपयोग होतो असा समज असल्याने त्याची बेकायदेशीर हत्या करण्यात येते. ह्या गेंड्याची एक संवय सांगण्यासारखी आहे. वार्धक्यामुळे अशक्त झालेला गेंडा कोठेतरी एकान्तात जातो आणि तेथेच मरतो.

---

## बंगलोर येथे टेलिव्हिजनच्या यंत्रसामग्रीचे उत्पादन

बंगलोर येथील भारत इलेक्ट्रॉनिक्स ह्या कारखान्यात टेलिव्हिजनसाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीचे उत्पादन करण्याची सिद्धता झाली आहे. कारखान्यात प्रक्षेपक, छायाचित्रक आणि इतर साधने ह्यांचे उत्पादन करता येईल. भारतामधील ७ मोठ्या शहरांची टेलिव्हिजन सेट्सची मागणी पुरविणे मात्र कारखान्याला आजच शक्य होणार नाही. मुंबई, मद्रास, कलकत्ता, हैदराबाद, बंगलोर, कानपूर आणि अहमदाबाद ह्या मोठ्या शहरांतूनच टेलिव्हिजनचे कार्यक्रम प्रथम प्रक्षेपित केले जातील. त्याशिवाय दिल्ली आहेच. ह्या सर्वांची मागणी पुरवावयाची झाल्यास १० लाख सेट्सची निर्मिती करावी लागेल. परंतु सध्या ज्या कारखान्यांना यंत्रसामग्री तयार करण्याची परवानगी देण्यात आली आहे त्यांची उत्पादनक्षमता दरसाल ३० हजार सेट्स पेक्षा अधिक नाही.

## मध्यवर्ती सरकारी नौकरांचे सेवानिवृत्तीचे वय

मध्यवर्ती सरकारच्या नौकरीत असलेल्या नोकरांचे वय ५० पूर्ण झाले किंवा त्यांच्या नौकरीची २५ वर्षे पूर्ण झाली तर त्यांना सेवानिवृत्त करण्याचे अधिकार सरकारने अलीकडे घेतले आहेत. सरकारी नौकरांत बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचा गवगवा गेल्या काही वर्षांत खूपच झालेला आहे. एखादा सरकारी नौकर भ्रष्टाचारी आहे अगर तो अकार्यक्षम आहे अशी सरकारची खात्री झाल्यावर सुद्धा त्याला कामावरून दूर करणे सेवानिवृत्तीचे वय ५५ असल्यामुळे शक्य होत नसे. सरकारी नौकरांत फैलावलेली लाचलुचपतबाजी नष्ट करण्यासाठी किंवा निदान तिला आळा घालण्यासाठी संतानम् कमिटीनेच वर दिलेले अधिकार सरकारने घ्यावे अशी शिफारस केली होती. परंतु सरकारने अद्यापपर्यंत निर्णय घेतलेला नव्हता. ही शिफारस अमलात आली तरी भ्रष्टाचारास कितपत आळा बसेल हे वेगळे; पण दरम्यान सरकारी नौकरांत ह्या नव्या उपक्रमाबद्दल असंतोष पसरत आहे. सरकारी नौकरांचे म्हणणे असे की नव्या उपक्रमामुळे सरकारी नौकरीबाबत अनिश्चितता उत्पन्न होईल आणि सरकारी नौकरीत नव्याने प्रवेश मिळविण्यास प्रतिकूल असे वातावरण निर्माण होईल. त्याशिवाय सरकारी नौकरांची अन्याय्य अशी सक्तीची सेवानिवृत्ती करण्यात आल्यास निष्कारण कोर्टकचेरी निर्माण होईल. २५ वर्षांच्या नौकरीनंतर सेवानिवृत्त करण्याच्या सरकारच्या अधिकाराचा वापर करण्यात आल्यास काही नोकरांना ५० वर्षे वय पूर्ण होण्याच्या आधीसुद्धा निवृत्त व्हावे लागणे शक्य आहे. ही गोष्ट अर्थातच इष्ट नाही. सरकारी नौकरीसंबंधी अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाल्यास सरकारी नौकरीतून निघून खाजगी उद्योगधंद्यात नौकऱ्या मिळविण्याच्या वृत्तीतही वाढ होईल.

---

## सुरतगड यांत्रिक शेतीत नफा

राजस्थानात सुरतगड येथे रशिआच्या मदतीने ३० हजार एकरावर पसरलेली मोठी यांत्रिक शेतवाडी उभारण्यात आली. १९५६ पासून स्थापन करण्यात आलेल्या ह्या शेतवाडीला फक्त एक दोन वर्षांतच थोडासा नफा झाला. गेल्या वर्षी मात्र ह्या यांत्रिक शेतीला १८ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला. इतका नफा होण्याचे हे पहिलेच वर्ष आहे. शेतवाडीची सर्व जमीन अजून लागवडीखाली आलेली नाही. कारण ३० हजार एकरांपैकी ४ हजार एकर जमिनीलाच बारमाही पाणी पुरवण्याची व्यवस्था आतापर्यंत झाली होती. सुमारे ६,००० एकर जमीन पाण्यासाठी इतर अनिश्चित साधनांवर अवलंबून आहे. राजस्थान कालवा पुरा झाल्यावर शेतवाडीच्या सर्व जमिनीला नियमित पाणीपुरवठा करता येईल. मग मात्र दरसाल बराच नफा होऊ लागेल असा अंदाज आहे.

### परदेशीय व्यापारापासून होणाऱ्या प्राप्तीत वाढ


आर्थिक विकास साधण्यासाठी भारताला इतर अप्रगत देशांप्रमाणे परदेशांची मदत घ्यावी लागते. अजून काही वर्षे तरी अशी मदत घ्यावी लागणार आहे. विकास साधण्यासाठी परदेशांकडून मिळणारी मदत कमी होत असल्याने निर्यात वाढवून जरूर ते परदेशीय चलन अधिक प्रमाणात मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या दृष्टीने १९६७ साल त्या मागील सालाच्या मानाने उत्साहवर्धक गेले. परदेशांशी होणाऱ्या व्यापारात भारताला गेल्या वर्षी १९६६ सालापेक्षा २१९·२३ कोटी रुपये अधिक मिळाले. ह्या वर्षी परदेशी व्यापारात होणाऱ्या प्राप्तीत बरीच वाढ होईल अशी अपेक्षा आहे. १९६७ साली निर्यात मालाची एकूण किंमत १२१०·५४ कोटी रुपये झाली. त्या मागील वर्षी त्याची किंमत ९९१·३१ कोटी रुपये झाली होती. म्हणजे गतवर्षी उत्पन्नात २३ टक्क्यांनी वाढ झाली. निर्यातीच्या दृष्टीने १९६७ मधील जानेवारी, मार्च, जुलै, सप्टेंबर, आक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर हे महिने अधिक चांगले गेले. निर्यातीत वाढ झालेल्या मालात पुढील काही माल आहे. हस्तोद्योगाच्या वस्तू, अभ्रक, मँगेनीझ, मिरच्या, कमावलेले कातडे, हातमागावर तयार करण्यात आलेले रेशमी कापड, कागद, पुठ्ठा, तंबाखू, इत्यादी. भारताकडून माल घेणाऱ्या देशांत इकॅफे भूभागातील देशांचा वाटा अधिक आहे. आफ्रिका, पूर्व युरोप आणि ब्रिटन ह्या देशांना करण्यात येणाऱ्या निर्यातीतही वाढ झालेली आहे. तथापि, युरोपीय सामायिक बाजारपेठेतील देश आणि अमेरिका व कॅनडा ह्या देशांना होणाऱ्या निर्यातीत मात्र घट झालेली आहे.

### सिंगापूरमधील हिंदी लोकांचे भवितव्य

ब्रिटनचे प्रजानन असलेल्या पण आशिआ खंडांतील रहिवाशांना ब्रिटनमध्ये येण्यास बंदी घालणारा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केला आहे. त्यामुळे पूर्वीच्या ब्रिटिश वसाहतीमधील हिंदी नागरिकांची कुचंबणा होत आहे. सिंगापूरमध्ये असे ६,००० लोक आहेत. बहुतेकजण दक्षिण भारतामधील असून सिंगापूरमधील ब्रिटिश लष्करी तळावर त्यांची उपजीविका अवलंबून आहे. हा तळ बंद करण्यात येणार असल्याने ते बेकार होणार आहेत. शिवाय ब्रिटनने मंजूर केलेल्या नव्या कायद्याप्रमाणे त्यांना ब्रिटनमध्ये जाता येईल किंवा नाही ह्याचीही शंका आहे. भारताने ब्रिटनशी जशास तसे धोरण स्वीकारल्यास त्यांची अवस्था केविलवाणी होईल.

### निर्गतीचे बाबतीत भारत सर्वांत शेवटी

१९६६–६७ मध्ये भारताने आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त ४·५% एवढी निर्गत केली; नेदरलंडसने ४०%, कॅनडाने २४%, प. जर्मनीने २३%, ग्रेटब्रिटनने १८%, इटलीने १६%, फ्रान्सने १५% आणि जपानने १३% केली. जागतिक निर्गतीच्या हिशेबात भारत कुठल्याकुठे खाली आहे. त्याचा त्यातील वाटा फक्त ०·७४% आहे. जागतिक निर्गतीपैकी १७% निर्गत एकट्या अमेरिकेने केली. त्याखालोखाल प. जर्मनी (११%), ग्रेटब्रिटन (८%), फ्रान्स (६%), कॅनडा (६%), जपान (६%), रशिया (५%), इटली (४·५%) हे देश येतात.



### वृत्तपत्राच्या कागदाची परदेशांकडून आयात

रशिआ आणि भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणे रशिया भारताला ह्या वर्षी ५२,५०० टन वृत्तपत्रांना लागणारा कागद पुरविणार आहे. आतापर्यंत कॉर्पोरेशनने वृत्तपत्राच्या कागदासाठी केलेल्या आयात करारांत हा करार सर्वात मोठा आहे. रशिआकडून आयात करण्यात यावयाच्या कागदाची किंमत जागतिक बाजारपेठेस धरूनच आहे. तथापि, गेल्या वर्षी रशिआकडून आयात करण्यात आलेल्या कागदाच्या किमतीच्या मानाने मात्र ती कमी आहे. अलीकडे ब्रिटनच्या पौंडाचे अवमूल्यन करण्यात आले आहे. त्याचा फायदा भारताला मिळून आयात कागदाच्या दर टनामागे भारताची १६० रुपयांची बचत झाली आहे. त्यामुळे ग्राहकांना कागद थोडाबहुत स्वस्त मिळू लागेल असा अंदाज आहे. १९५८–५९ पासून भारताचे सरकारी व्यापार महामंडळ अनेक देशांकडून वृत्रपत्रांसाठी लागणाऱ्या कागदाची मोठ्या प्रमाणावर खरेदी करीत आहे. त्यामुळे ह्या कागदाची किंमत बरीच कमी झाली आहे. १९६८–६९ सालात आणखी ७९,००० टन कागद आयात करण्याची व्यवस्था व्यापार महामंडळाने केली आहे. त्यापैकी २५,००० टन खुल्या बाजारात घेण्यात येणार आहे. त्याशिवाय १६ हजार टन कॅनडाकडून, १७ हजार टन अमेरिकेकडून, ११ हजार टन स्वीडन-नॉर्वेकडून, ६ हजार टन झेकोस्लोव्हाकिआकडून आणि ४ हजार टन पोलंडकडून मिळविण्यात येणार आहे. भारतामधील वृत्तपत्रांच्या कागदाचे उत्पादन सध्या दरसाल ३० हजार टन आहे, ते १९६९ अखेर ३८ हजार टनांपर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे. १९७०–७१ मध्ये ते ७० हजार टनांपर्यंत जाईल. परंतु कागदाची मागणी अधिक वेगाने वाढेल असे दिसते.

---

### सांगली जिल्हा लँड मॉर्गेज बँकेचे नवे चेअरमन व व्हाइस चेअरमन

सांगली जिल्हा लँड मॉर्गेज बँकेचे चेअरमन म्हणून श्रीमंत सरदार आबासाहेब शिंदे म्हैसाळकर यांची एकमताने निवड झाली. ही बँक स्थापन झाल्यापासून ते तेथे काम करीत असतात. श्री. कृष्णराव संडेराव घाटगे व्हाइस चेअरमन म्हणून निवडून आले.

---

### जेट युगातला मराठी माणूस


व्हीनस व्याख्यान मालेतील ह्या वर्षाचे पुष्प श्री. शंतनुराव किर्लोस्कर हे गुंफणार असून, त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'जेट युगांतला मराठी माणूस' असा आहे. ही व्याख्याने दि. २३, २४ व २५ रोजी पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहात होतील.


भूकंपाने जमीनच नव्हे तर जीवनच हादरले आहे

असंख्य उद्ध्वस्त संसार सावरण्यासाठी भूकंपग्रस्तांना सढळ हाताने मदत करा

आपली मदत खालील पत्त्यावर पाठवा:
कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती
इंडस्ट्रीयल अॅशुरन्स बिल्डिंग, पांचवा मजला.
चर्चगेट स्टेशनसमोर मुंबई.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

### मोटारींच्या व स्कूटर्सच्या उत्पादनात वाढ

गेल्या दोन वर्षात भारतामधील मोटारींच्या व स्कूटर्सच्या उत्पादनात ३३ टक्यांनी वाढ झाली आहे. १९६५ मध्ये २४,७९० मोटारींचे उत्पादन करण्यात आले होते. १९६७ साली ३३,३३९ मोटारी निर्माण करण्यात आल्या. स्कूटर्सच्या उत्पादनाचे आकडे अनुक्रमे २०,२९६ व ३०,३०२ असे आहेत. ह्याच कालावधीत ३ चाकी मोटारींच्या उत्पादनात ५० टक्क्यांची वाढ झाली. १९६७ साली ३,९८० तीन चाकी मोटारी तयार करण्यात आल्या. तथापि, जीपगाड्या आणि व्यापारी वहातुकीसाठी लागणाऱ्या मोटारगाड्या ह्यांचे उत्पादन मात्र १९६५ च्या मानाने कमी झाले. १९६५ साली १०,५०० जीपगाड्या आणि ३७,००० मालमोटारी तयार करण्यात आल्या होत्या. १९६७ साली त्यांचे उत्पादन अनुक्रमे ५,५६१ आणि ३१,४६२ इतकेच झाले.

---

### रासायनिक खतांची मोठ्या प्रमाणावर आयात

आधुनिक शेतीत रासायनिक खतांना असलेले महत्त्व लक्षात घेऊन मध्यवर्ती सरकारने अशा खतांची आयात मोठ्या प्रमाणावर करण्याचा निर्णय घेतला आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी खतांची आयात होऊन त्यांच्या वाटपाचीही व्यवस्था होणे अगत्याचे आहे, नाही तर शेतकऱ्यांना खते योग्य वेळी मिळणार नाहीत. राज्य सरकारांनी आपल्या गरजा मध्यवर्ती सरकारला कळवून खताच्या वाटपाची व्यवस्था वेळेवर करावी अशी सूचना अन्नमंत्री श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांनी केली आहे. चालू हंगामासाठी मध्यवर्ती सरकार १० लाख टन रासायनिक खतांची आयात करणार आहे. त्याशिवाय देशात उभारण्यात आलेल्या खतांच्या कारखान्यांतून आणखी ७ लाख टन खत निर्माण होऊ शकेल असा अंदाज आहे.


---

### पोलादाच्या निर्यातीला धोका ?

अमेरिकेत परदेशांतून आयात करण्यात येणाऱ्या पोलादाविषयी चौकशी सुरू करण्यात येणार आहे. परदेशांतून येणाऱ्या स्वस्त पोलादाची स्पर्धा अमेरिकेच्या पोलाद कारखान्यांना जाणवत आहे असे दिसते. चौकशीच्या शेवटी अमेरिकेने पोलादाच्या आयातीवर निर्बंध घातल्यास त्यामुळे भारताच्या पोलाद कारखान्यांना झळ पोचणार आहे. भारताने ह्यासंबंधी अमेरिकेकडे चिंता व्यक्त केली आहे. गेल्या काही महिन्यांत आलेल्या आर्थिक मंदीमुळे भारतामधील पोलाद कारखान्यांच्या मालाचा उठाव होत नव्हता. अलीकडे ह्या परिस्थितीत थोडी सुधारणा होऊ लागली होती. परंतु तरीही कारखान्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता वापरली जाण्यास अद्याप अवधी लागणार आहे, इतक्यातच निर्यातीला धोका उत्पन्न होऊ पाहात आहे.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक ‘ अर्थ ’
किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठी
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे....
कारण, अत्यंत कार्यक्षम व किफायतशीर चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत. किर्लोस्कर एंजिनें चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सना लागणाऱ्या खर्चाच्या मानाने फारच कमी येतो.



किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत).

### एंजिनिअर्सची वाढती बेकारी

एंजिनिअर्स आणि तांत्रिक शिक्षण घेतलेले डिप्लोमावाले ह्यांच्या बेकारीने अलीकडे लक्ष वेधून घेतले आहे. इतर विषयांची उच्च पदवी घेतलेले लोक बेकार नाहीत असा त्याचा अर्थ नाही. शिक्षणाचे नियोजन नीट करण्यात आलेले नाही, इतकाच त्याचा अर्थ आहे. १९६७ अखेर हिंदमधील उद्योगविनिमय केंद्रांतून २७ लाख शिक्षितांनी नोकरीसाठी नावे नोंदविली होती. अर्थात इतकेच लोक बेकार होते असे म्हणता येत नाही. अनेकांनी नावे नोंदविण्याची दक्षता घेतलेली नसणार हे उघड आहे. गेल्या वर्षी भारतामधील कॉलेजांतून २·५ लाख पदवीधर शिक्षण पूर्ण करून बाहेर पडले. ह्या आकड्यात एंजिनिअर्स व डॉक्टर्स ह्यांची संख्या धरलेली नाही. इतक्या सगळ्या पदवीधरांना नोकरी देता येणे शक्य आहे किंवा नाही हा खरा प्रश्न आहे. ते शक्य नसेल तर दरसाल इतक्या शिक्षितांची बेकारीत भर पडत जाणार. पदवीधरांना अंगमेहनतीची कामे जमणार नाहीत. दरसाल सुमारे १० हजार डॉक्टर्स वैद्यकीय शिक्षण पूर्ण करतात. वैद्यकीय शिक्षणातील एम्. बी. बी. एस्. ची पदवी अर्थार्जनाच्या दृष्टीने अपुरी पडत असल्याने अधिक उच्च अभ्यास करण्याची जरुरी उत्पन्न होते. एंजिनिअरिंगच्या पदवीधरांनाही हाच अनुभव येण्याची बरीच शक्यता असते. गेल्या वर्षी भारतामधील तांत्रिक शिक्षण संस्थांतून १३ हजार पदवीधर एंजिनिअर्स आणि २१,६२० डिप्लोमाधारक शिकून तयार झाले. आता तांत्रिक संस्थांतून प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

---

### विजेच्या तारांना परदेशाची मागणी

विजेच्या तारा करणाऱ्या हिंदी कंपन्यांनी आपला एक गट बनवून कुवेत ह्या देशाला ३·३ कोटी रुपये किंमतीच्या तारा देण्याची मागणी मिळविली आहे. आणखी एक कोटी रुपयांच्या तारांची मागणी लवकरच नोंदविण्यात येणार आहे. ह्या धंद्यात अलीकडे मंदीची लाट आलेली आहे. त्यामुळे वीजवाहक तारांच्या कारखान्यांच्या एकूण उत्पादनक्षमतेपैकी एकदशांश उत्पादनक्षमता सुद्धा वापरण्यात येत नव्हती. जागतिक बाजारपेठेत स्थान मिळविण्यासाठी ह्या गटाला जोराच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड द्यावे लागले. इतर आंतरराष्ट्रीय कंपन्यांपेक्षा हिंदी कंपन्यांच्या तारा स्वस्त होत्या. कलकत्ता व मुंबई ह्या बंदरांतून आता कुवेतला जलमार्गाने तारा पाठविण्यात येत आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

३१ डिसेंबर, १९६७ अखेर संपलेल्या वर्षी महाराष्ट्र बँकेस सर्व खर्चवेच वजा जाता व प्राप्तीकरासाठी आणि इतर नित्याच्या व आवश्यक तरतुदी केल्यानंतर २०,९९,८९१ रु. निव्वळ नफा झाला. द. सा. द. शे. १० टक्के करपात्र लाभांश देण्यात येणार आहे. अहवालाचे वर्षी कर्वे रोड (पुणे), दापोडी (पुणे), औंध (पुणे), मालाड (मुंबई), नागदेवी (मुंबई), रहिमतपूर (सातारा) आणि बडनेरा अशा सात शाखा काढण्यात आल्या. पुढील दोन वर्षांच्या काळात एकूण २९ शाखा उघडण्यात यावयाच्या आहेत. अहवालसाली बँकेने मुंबईत अपोलो मार्गावर एक भव्य इमारत खरेदी केली आहे. तेथे मुंबई फोर्ट शाखेची व्यवस्था करण्यात आली आहे. ह्याच साली पिंपरी (पुणे) येथील शाखेची इमारत विकत घेतली असून नागपूर–सीताबर्डी आणि नाशिक येथे स्वतःच्या इमारती बांधल्या आहेत.

बँकेचे वसूल भांडवल १,२८,५६,२५० रु. इतके झाले असून गंगाजळी व इतर निधी ५६,७०,३६० रुपयांचे झाले आहेत. गेल्या वर्षअखेर ५६ कोटी रु. च्या ठेवी होत्या, त्या आता ६३ कोटी रु. च्या झाल्या आहेत. बँकेची रोख व इतर बँकेकडील शिल्लक ४ कोटी, २ लक्ष रु. असून रोख्यातील गुंतवणूक २२ कोटी रुपयांची आहे. दिलेली कर्जे ४० कोटी रु. ची आहेत.

महाराष्ट्र बँकेचे धोरण, प्रथमपासूनच लघुउद्योगांना विशेष मदत करण्याचे आहे. त्यामुळे नव्या सरकारी निर्बंधांत बसण्यासाठी महाराष्ट्र बँकेला मुद्दाम प्रयत्न करायला नको; तिचाच आदर्श इतर बँकांनी ठेवावा, अशी तिची कृती आहे. महाराष्ट्रातील लहान आसामींचे लहान उद्योगधंदे मोठे करण्यासाठी तर महाराष्ट्र बँकेचा जन्म आणि प्रतिज्ञा आहे. महाराष्ट्र बँकेने दिलेल्या एकूण ४० कोटी रु. कर्जापैकी २६ कोटी रु. उद्योगधंद्यांना दिलेले आहेत आणि त्यांतील लघुउद्योगांचा वाटा ९·३ कोटी रु. आहे. ह्या ९·३ कोटी रु. ची फोड शेवटी दिली आहे.

महाराष्ट्र बँकेच्या प्रवर्तकांची, लघुउद्योगांची सेवा आणि वाढ ह्याबाबत धोरणे व परंपरा कार्यवाहीत आणण्यात श्री. चिं. वि. जोग ह्यांचा फार मोठा वाटा आहे. ते गेली २४ वर्षे बँकेचे प्रथम मॅनेजर व नंतर जनरल मॅनेजर होते, ते आता सरकारी धोरणास अनुसरून संचालक मंडळाचे अध्यक्ष झाले आहेत. त्यांनी आपले सर्व आयुष्य महाराष्ट्र बँकेसाठी वेचले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली नवे कर्तबगार व्यवस्थापक निर्माण होतील आणि बँकेची उत्तरोत्तर आणखी प्रगती होईल ह्यात संशय नाही.

**महाराष्ट्र बँकेने लघुउद्योगांस दिलेली कर्जे**

(आकडे लक्ष रुपये)

| | |
|---|---|
| मोटार वर्कशॉप, गॅरेज, वगैरे | १०·०० |
| काच आणि काचसामान | १२·०० |
| बांधकाम व इतर | १६·०० |
| प्रयोगशाळेची उपकरणे | २३·०० |
| इतर विविध उद्योग | २४·०० |
| रंग व रसायने | ३४·०० |
| खाद्यपेये | ३५·०० |
| विजेची उपकरणे | ६९·०० |
| लेखनसाहित्य, कागद वगैरे | २३·०० |
| औषधे | १०५·०० |
| छापखाने | ४६·०० |
| तंतू व कापड उद्योग | ३६·०० |
| जिनिंग, प्रेसिंग | १८·०० |
| तांदूळ, डाळ, तेलगिरण्या, वगैरे | ३१·०० |
| फर्निचर | ४५·०० |
| वाहतूक | ३०·०० |
| कंत्राटदार | ७४·०० |
| स्थापत्य उद्योग | २०८·०० |
| इतर | ९९·०० |
| | ९२८·०० |

**नवा सहकारी साखरकारखाना**—बेळगावपासून १८ मैलांवर असलेल्या एका गावी सहकारी साखरकारखाना उभारण्याचा परवाना मध्यवर्ती सरकारने दिला आहे. कारखान्यासाठी इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनने १·२० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. यंत्रसामग्री वालचंदनगर कारखान्याकडून घेतली जाणार आहे. कारखान्यात रोज १,२५० टन गळित होऊ शकेल.

**पेनिसिलिनचा कारखाना चालू झाला**—हृषीकेश येथील औषधाच्या कारखान्याचे दोन विभाग चालू करण्यात आले आहेत. पेनिसिलिन आणि स्ट्रेप्टोमायसिन ह्या औषधांचे आता व्यापारी उत्पादन करण्यात येऊ लागले आहे. वर्षअखेर आणखी कांही औषधांचे उत्पादन सुरू होईल. हा कारखाना रशिआच्या साह्याने उभारला गेला आहे.

**रशिआची कापड-खरेदी**—रशिआने भारताकडून ५·२५ कोटी रुपये किंमतीचे सुती कापड खरेदी करण्याचे ठरविले आहे. ही सर्व खरेदी १९६८ साल संपण्यापूर्वी करण्यात येऊन रशिआला पाठविण्यात यावयाची आहे. १९६६ साली रशिआने ४·९ कोटी रुपयांचे कापड खरेदी केले होते. भारतामधील उद्योगधंद्यांत आलेली मंदी नाहीशी करण्यासाठी रशिआ भारताकडून इतरही माल घेण्यास तयार आहे.

**दम्यावर सर्पविषाचे औषध**—रशिआने ताश्कंद येथील एका औषधाच्या कारखान्यात सर्पविषाचा उपयोग करून दम्यावर वापरण्यासाठी प्रभावी औषध तयार करण्यास प्रारंभ केला आहे. ताश्कंद येथे सर्पविष मिळविण्यासाठी एक सर्पनिवास उभारण्यात आले आहे. तेथील सर्पांपासून दरसाल ४०० ग्रॅम सर्पविष कारखान्याला मिळते. सर्पविषाची किंमत सोन्यापेक्षाही अधिक असते.

**श्री. वा. काळे ह्यांची**

**कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके**

**१ ऋण आणि क्षण, २ पुढे पाऊल,**

**३ तुमचे स्थान कोणते ?**

**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्य व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

चवदार पिठासाठी

**पिठाच्या चक्क्या**

- बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
- मजबूत बांधणी
- अद्यावत् यंत्र योजना
- साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९



उत्पादक -

**भिडे अँन्ड सन्स, प्रा. लि. सांगली**

**महाराष्ट्र राज्य.**

**महाराष्ट्र सरकारने**


**तगाईवर मंजूर केलेले**

**"विजय" नांगर**

**वापरा.**

**४, ६ व ८ बैली**

**फाळ व सुटे भाग**



**तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्**




**१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.**

**शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.**

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

**विश्रामबाग — सांगली ( महाराष्ट्र )**

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई. | महाल नागपूर. |

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६५,९६,००० |

**: बृहन् मुंबईतील शाखा :**

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

**: नागपूर विभागातील शाखा :**

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.